इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग आणि इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालयाकरीता "नियंत्रक अधिकारी" व "आहरण व संवितरण अधिकारी" घोषित करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-२०२६/प्र.क्र.१२६/प्रशा-१ (E-1782268)**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: १२ ऑगस्ट, २०२६

**संदर्भ:**

१) शासन अधिसूचना शाकानि-२०२६/प्र.क्र.२०/र.व.का.-१, दि. २१ एप्रिल, २०२६

२) इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग, शासन निर्णय क्र. आकृती-२०२६/ प्र.क्र.०२/ प्रशा-१, दि. २४ एप्रिल, २०२६. (नवीन आयुक्तालय)

३) इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग, शासन निर्णय क्र. आयुका-२०२६/ प्र.क्र.०२/ प्रशा-१, दि. २४ एप्रिल, २०२६. (आकृतिबंध)

**प्रस्तावना:**

उपरोक्त संदर्भ क्र.१ च्या शासन अधिसूचनेन्वये इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग हा नवीन विभाग निर्माण करण्यात आला आहे. तसेच संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णयान्वये नवीन विभागाच्या अधिनस्त इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालय निर्माण करण्यात आले आहे. संदर्भ क्र. ३ च्या शासन निर्णयान्वये नवीन विभाग तसेच नवीन आयुक्तालयाचा आकृतिबंध मंजूर करण्यात आला असून त्यानुसार विभागाकरिता ७४ पदे (६१ नियमित पदे + १३ बाह्ययंत्रणेद्वारे) तर आयुक्तलयासाठी ७७ पदे (६२ नियमित पदे +१५ बाह्ययंत्रणेद्वारे) निर्माण करण्यात आली आहेत. त्याअनुषंगाने विभाग व आयुक्तालयाकरीता "नियंत्रक अधिकारी" व "आहरण व संवितरण अधिकारी" घोषित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** :

इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग आणि इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालय यांच्याकरीता खालील अधिकाऱ्यांना "नियंत्रक अधिकारी" व "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे:-

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | नियंत्रक अधिकारी | आहरण व संवितरण अधिकारी |
|---|---|---|---|
| १ | इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग, मंत्रालय, मुंबई | उप सचिव, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग | सहायक लेखा अधिकारी, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग |
| २ | इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालय, मुंबई | आयुक्त, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालय, मुंबई | लेखा अधिकारी, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालय, मुंबई |

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ मधील नियम १५(३) व १५६ मधील तरतुदीनुसार तसेच वित्तीय अधिकार नियमपुस्तिका १९७८, भाग-पहिला, दि. १७ एप्रिल,२०१५ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या वित्तीय अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर अधिकार हे केवळ वित्तीय बाबींपुरतेच मर्यादित राहतील. त्यानुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांनी वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण २०२३/प्र.क्र.८८/२३/कोषा-प्रशा-५, दिनांक ०३ ऑक्टोबर, २०२३ मधील नमूद सूचनांचे काटेकोर अनुपालन करण्याची खबरदारी घ्यावी.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेला असून त्याचा संकेतांक २०२६०८१२११४१५९२०११ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by YOGESH MAHADEO GOSAVI
Date: 2026.08.12 11:43:24 +05'30'

**(योगेश गोसावी)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) महालेखापाल-१, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
२) महालेखापाल-१, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई,
३) महालेखापाल-२, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर,
४) महालेखापाल-२, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर,
५) प्रबंधक, लोकायुक्त व उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
६) आयुक्त, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालय, मुंबई,
७) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादीत, मुंबई,
८) संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई,
९) सदस्य सचिव, राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग, मुंबई,
१०) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
११) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
१२) जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालये (सर्व),
१३) निवडनस्ती/ प्रशा-१